म. रा. पुणे - १.
31 MAR 2010
आवक क्र. आवक लिपिक

राष्ट्रीय स्तरावर शालेय, ग्रामीण (पायका) व महिला क्रीडा स्पर्धेत सहभागी राज्यातील खेळाडूंच्या शिष्यवृत्तीत वाढ व आंतरराष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेसाठी शिष्यवृत्ती लागू करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
शासन निर्णय क्रमांक : अताप्र-१००८/(प्र.क्र.४२८/०८)/क्रीयुसे-२,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : २२ मार्च,२०१०.

वाचा :- (१) शासन निर्णय, समाजकल्याण व क्रीडा विभाग क्रमांक-पीएचई-२१८४/३५६८/(९२)/एसवायएस, दिनांक २८ नोव्हेंबर,१९८४.
(२) शासन निर्णय, समाजकल्याण व क्रीडा विभाग क्रमांक-पीएच-१०९३/प्र.क्र.१४८/क्रीयुसे-१, दिनांक २८ नोव्हेंबर,१९९५.

प्रस्तावना :- राज्यात तालुका ते राष्ट्रीय स्तरावर भारतीय शालेय खेल महासंघ यांच्यावतीने शालेय खेल स्पर्धा, तसेच भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या महिला व ग्रामीण (पायका) क्रीडा स्पर्धा यांचे आयोजन क्रीडा व युवकसेवा संचालनालय करते. मागील ५ वर्षातील राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेतील राज्याची कामगिरी पाहता गत ५ वर्षापासून महाराष्ट्र राज्य हे अव्वल स्थानावर आहे.

सद्य:स्थितीत राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये महाराष्ट्र राज्याच्या संघातून सहभाग घेतलेल्या खेळाडूला रु.३००/- तर प्राविण्य (प्रथम,द्वितीय,तृतीय क्रमांक प्राप्त) मिळविलेल्या खेळाडूला प्राविण्यानुसार रु.३०००/-, रु.२,७००/- व रु.२,१००/- अशी वार्षिक शिष्यवृत्ती दिली जाते. हे दर दिनांक २८ नोव्हेंबर,१९९५ च्या शासन निर्णयाद्वारे निश्चित केले आहे. या खेळाडूंना अधिक प्रोत्साहन मिळण्यासाठी सध्याच्या शिष्यवृत्तीत वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

याशिवाय सद्य:स्थितीत राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेतील राज्याच्या खेळाडूंना सहभाग व प्राविण्य शिष्यवृत्ती मिळत असली तरी आंतरराष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेतील सहभाग व प्राविण्य प्राप्त राज्यातील खेळाडूंना शिष्यवृत्ती देण्याची सध्या तरतूद नाही. आंतरराष्ट्रीय स्तरावर भाग

स्वाक्षांकित
सादर



घेणा-या या खेळाडूंना अधिक प्रोत्साहन मिळण्यासाठी त्यांना शिष्यवृत्ती ... लागू करण्याची बाबही शासनाच्या विचाराधीन होती.

**: शा स न नि र्ण य :**

सन २०१०-११ पासून राष्ट्रीय शालेय, ग्रामीण (पायका) व महिला क्रीडा स्पर्धेमध्ये राज्याच्या संघातून सहभाग घेणा-या व प्राविण्य मिळविणा-या खेळाडूंना परिच्छेद-३ मधील अटी व शर्तींच्या अधीन राहून खालील प्रमाणे सुधारित शिष्यवृत्ती देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे :-

| अ.क्र. | प्राविण्य | सध्याच्या योजनेनुसार वार्षिक शिष्यवृत्ती रक्कम | सुधारित योजनेनुसार वार्षिक शिष्यवृत्ती रक्कम |
|---|---|---|---|
| १ | प्रथम क्रमांक | ३,००० | ९,००० |
| २ | द्वितीय क्रमांक | २,७०० | ७,२०० |
| ३ | तृतीय क्रमांक | २,१०० | ५,४०० |
| ४ | सहभाग | ३०० | ३,००० |

२. सन २०१०-११ पासून आंतरराष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेतील सहभाग व प्राविण्य प्राप्त राज्यातील खेळाडूंना परिच्छेद-३ मधील अटी व शर्तींच्या अधीन राहून खालील प्रमाणे शिष्यवृत्ती लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे :-

***आंतरराष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा***

| अ.क्र. | प्राविण्य | वार्षिक शिष्यवृत्ती रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रथम क्रमांक | २४,००० |
| २ | द्वितीय क्रमांक | १८,००० |
| ३ | तृतीय क्रमांक | १२,००० |
| ४ | सहभाग | ९,००० |

३. उपरोक्त दोनही परिच्छेदातील सुधारित शिष्यवृत्ती मंजूर करताना खालील प्रमाणे अटी व शर्ती लागू राहतील :-

(१) क्रीडा व युवकसेवा संचालनालयामार्फत आयोजित करण्यात आलेल्या क्रीडा स्पर्धेतून खेळाडू राज्याच्या संघातून राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत सहभागी झालेला असावा,

(२) भारतीय शालेय खेल महासंघाच्या वतीने आयोजित राष्ट्रीय शालेय खेल स्पर्धेत राज्याच्या वतीने सहभाग घेऊन राष्ट्रीय संघात निवड होऊन आंतरराष्ट्रीय शालेय खेल स्पर्धेत सहभागी झालेला असावा,

(३) राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी झालेल्या खेळाडूस एका वर्षामध्ये राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय यापैकी एकच शिष्यवृत्ती देण्यात येईल.

(४) प्राविण्य प्राप्त केलेल्या खेळाडूंना सहभागासाठीची शिष्यवृत्ती रक्कम न देता त्यांना केवळ प्राप्त प्राविण्यासाठीची शिष्यवृत्ती रक्कम देण्यात येईल.

(५) खेळाडूंची कामगिरी उपरोक्त निकषावर तपासून शिष्यवृत्ती मंजूर करण्याचे अधिकार संचालक, क्रीडा व युवकसेवा, पुणे यांना राहतील,

(६) सुधारित शिष्यवृत्ती योजना ही दिनांक १ जून,२०१० ते दिनांक ३१ मे,२०११ या शैक्षणिक वर्षात व त्यापुढे होणा-या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धांपासून लागू होईल. त्यापूर्वीच्या स्पर्धांना या योजनेचा लाभ मिळणार नाही.

४. खेळाडूंना शिष्यवृत्ती देण्याच्या योजनेकरिता होणारा खर्च "२२०४-क्रीडा व युवकसेवा-१०४-क्रीडा व खेळ (०९) (०१) क्रीडा नैपुण्य शिष्यवृत्त्या ३४ शिष्यवृत्त्या/विद्यावेतने (२२०४ १६६ ७) योजनेतर" या लेखाशीर्षाखाली टाकण्यात यावा. या प्रयोजनार्थ संचालक, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. सदरहू शासन निर्णय वित्त विभागाच्या संमतीने तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक-२७/१०/व्यय-५, दिनांक १५.१.२०१० अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर **(www.maharashtra. gov.in)** उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक-२०१००३२२१७०४०६००१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( सतीश जोंधळे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

(१) मा.राज्यपालांचे सचिव,
(२) मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव,
(३) मा.उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
(४) प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
(५) मा.मुख्य सचिव यांचे सह सचिव,
(६) संचालक, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे,
(७) संचालक (प्राथमिक/माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,

(८) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
(९) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
(१०) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
(११) सर्व विभागीय आयुक्त,
(१२) सर्व जिल्हाधिकारी,
(१३) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
(१४) सर्व उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा,
(१५) जिल्हा माध्यमिक शिक्षण अधिकारी (सर्व),
(१६) सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी,
(१७) मा.मंत्री (क्रीडा) यांचे खाजगी सचिव,
(१८) मा.राज्यमंत्री (क्रीडा) यांचे खाजगी सचिव,
(१९) सर्व सह सचिव / उप सचिव / अवर सचिव / सर्व कार्यासने,
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
(२०) वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
(२१) निवड नस्ती (क्रीयुसे-२).

------